**अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
जुनी मध्यवर्ती इमारत दुसरा मजला, पुणे-1
दुरध्वनीक्र.020/26124815फॅक्स क्र. 26125878
Email I.D. : igoffice.oandm-mh@gov.in

---

**परिपत्रक/ महत्वाचे**

जा.क्र. इप्रवि/आपतकालीन परिस्थिती/उपययोजना/ 10894 /२०१८/कक्ष-६, (२), पुणे, दिनांक 17.११.२०१८

**विषय:- कारागृहातील आपतकालीन परिस्थिती बाबत उपाययोजना करणेबाबत.**

महालेखापाल,(लेखा परीक्षण)-२,महाराष्ट्र, नागपूर यांच्या कडील लेखापरीक्षकांनी सन २००७-१८ मध्ये महाराष्ट्र राज्यातील कारागृहांचे प्रशासनातील कामगिरीचे लेखापरिक्षण केलेले आहे. या परिक्षणामध्ये परिच्छेद क्र.७.१० मध्ये कारागृह विभागाने आपत्ती व्यवस्थापन धोरण तयार केले आहे. परंतु आपत्ती व्यवस्थापनाबाबतची विशिष्ठ प्रकारची माहिती अद्यावत नव्हती. तसेच येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथील अग्निशमन उपकरणांची तपासणी करण्यात आलेली नाही. कारागृहात आपत्ती कालीन परिस्थिती उदभवल्यास आव्हान पुर्ण करण्यास उपायोजना अपु-या आहेत. असा मुद्दा उपस्थित केला आहे.

कारागृह अधीक्षकांनी आपतकालीन परिस्थिती उदभवल्यास कोणत्या प्रकारच्या उपायोजना करणे आवश्यक आहे. याबाबत स्थानिक अग्निशमक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आपतकालिन विभाग तसेच पोलीस विभाग यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच आणीबाणी परिस्थिती करीता कारागृहाचे बांधकामामध्ये बदल करावयाचे असल्यास महाराष्ट्र कारागृह नियमावली १९७९ मधील प्रकरण क्र.५ मधील नियम क्र.२ (पान क्र.५३) नियम क्र.९ (पान क्र.५४) नुसार अस्तित्वात असलेल्या कारागृहाचे बांधकामामध्ये बदल करण्याचे अधिकार कारागृह महानिरीक्षक किंवा विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांना आहेत. तसेच महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.०१ डिसेंबर,२०१५ मधील नियम १० नुसार कारागृहाचे बांधकामामध्ये बदल करण्याचे अधिकार अति.पोलीस महासंचालक (कारागृह), कारागृह महानिरीक्षक, विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक, यांना आहेत.

वास्तव कारागृहातील आपतकलीन परिस्थितीबाबत तात्काळ उपययोजना करणे संदर्भात प्रत्येक कारागृहाने त्यांचेकडील स्थानिक परिस्थिती /बाबीच्या अनुषंगाने मानद कार्यप्रणाली (S.O.P.) तयार करण्यात यावी. तसेच मानद कार्यप्रणाली (S.O.P.) तयार करतेवेळी विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक, यांचे मार्गदर्शन घ्यावे. त्यानंतर सदर मानद कार्यप्रणालीस विभागीय कारागृह उपमहानिरीक्षरीक्षक यांची मंजूरी घेतल्यानंतर मुख्यालयाकडे माहितीस्तव मानद कार्यप्रणाली (S.O.P.) सादर करण्यात यावी. तसेच मानद कार्यप्रणालीचे आवश्यकतेनुसार वेळोवेळी प्रात्याक्षिक घेण्यात यावे.

(मा.अ.पो.म.सं.यांचे मान्यतेने )

( **एस.व्ही.खटावकर** )
प्र.कारागृह उपमहानिरीक्षक (मु.)
कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

अधिक्षक,
मध्यवर्ती / जिल्हा /खुले/विशेष कारागृह (सर्व )
प्राचार्य, चौ.जा.तु.अ.प्र.म.वि.येरवडा,पुणे, किशोर सुधारालय, नाशिक,
संपर्क अधिकारी, खुली वसाहत, आटपाडी, जि.सांगली

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव,

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, (कारागृह), दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई -८
मा. कारागृह उपमहानिरीक्षक, (सर्व)